महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग
सहसंचालक, लेखा व कोषागारे, छ.संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
लेखाकोष भवन, दुसरा मजला, फाजलपुरा, छ.संभाजीनगर
☎ - 0240-2331874
Email ID- jd.aurangabad@mahakosh.in **Fax No 0240-2331874**

जा.क्र.सहसंलेवको/प्रशा-10/क.ले./क.ले.भरती प्रक्रिया/2025/ 699 दिनांक :- 27 MAR 2025

प्रति,
सहसंचालक,(संगणक/सुधारणा)
संचालनालय, लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- कनिष्ठ लेखापाल भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने उमेदवारांना प्रश्नपत्रिकेचे स्वरुप, कालावधी व परिक्षेचा दिनांक संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी कळविण्यात येते की, सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर या विभागाची कनिष्ठ लेखापाल पदाच्या भरती प्रक्रियेसाठी घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेच्या अनुषंगाने प्रश्नपत्रिकेचे स्वरुप, कालावधी व परिक्षेचा दिनांक यांबाबतच्या सुचना संचालनालयाच्या https://mahakosh.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर आज दिनांक २७/०३/२०२५ रोजी प्रसिध्द करावी, हि विनंती.

सोबत - सूचनापत्र

(रेहाना अ. काझी)
सहसंचालक,
लेखा व कोषागारे, छ.संभाजीनगर.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग
सहसंचालक, लेखा व कोषागारे, छ.संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
लेखाकोष भवन, दुसरा मजला, फाजलपुरा, छ.संभाजीनगर
☎ - 0240-2331874
Email ID- jd.aurangabad@mahakosh.in Fax No 0240-2331874

जा.क्र.सहसंलेवको/प्रशा-10/क.ले./क.ले.भरती प्रक्रिया/सूचनापत्र/2025/ 699 दिनांक : 27 MAR 2025

विषय :- कनिष्ठ लेखापाल भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने उमेदवारांना प्रश्नपत्रिकेचे स्वरुप, कालावधी व परिक्षेच्या दिनांकाबाबत सूचनापत्र

संदर्भ :- या कार्यालयाची जाहिरात क्रमांक सहसंलेवको/सरळसेवा भरती/क.ले./छ.सं.नगर/2024/ दिनांक 17.01.2025

सूचनापत्रक

सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर विभागाची कनिष्ठ लेखपाल रिक्त पदाची जाहिरात संदर्भिय जाहिरात क्रमांक दिनांक 17/01/2025 रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदरील परीक्षेच्या अनूषंगाने खालील प्रमाणे सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

- प्रश्नपत्रिकेतील 100 प्रश्नाचे विभाजन चार (A,B,C आणि D) कालबध्द विभागात खालीलप्रमाणे येईल. प्रत्येक विभागात 25 प्रश्न असतील आणि 30 मिनिटे वेळ दिला जाईल.

अ.क्र.	विषयाचे नाव	कालबध्द विभाग			
		Group A	Group B	Group C	Group D
1	मराठी	7	6	6	6
2	इंग्रजी	6	7	6	6
3	सामान्य ज्ञान	6	6	7	6
4	बौध्दिक चाचणी	6	6	6	7
प्रश्नांची संख्या		25	25	25	25
विभागानूसार वेळ		30 मिनिटे	30 मिनिटे	30 मिनिटे	30 मिनिटे

- मागील विभागासाठी दिलेला वेळ पूर्ण करेपर्यंत उमेदवारांना पुढील विभागात जाण्यास प्रतिबंध केला जाईल. या व्यतिरीक्त, उमेदवारांना विभागनिहाय दिलेला वेळ पूर्ण झाल्यानंतर प्रश्नांचे पुनरावलोकन करण्याची किंवा त्यांच्या प्रतिसादात बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही. मागील विभागासाठी दिलेला वेळ पूर्ण झाल्यानंतर पुढील विभागाचे प्रश्न आपोआप सुरु होतील.
- सहसंचालक, लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर या विभागाची कनिष्ठ लेखापाल पदाची ऑनलाईन परीक्षा दिनांक 19/04/2025 रोजी घेण्यात येईल.

(रेहाना अ. काझी)
अध्यक्ष प्रा.नि.स.तथा सहसंचालक,
लेखा व कोषागारे, छत्रपती संभाजीनगर.